

युथिका सोसायटीतील स्मार्ट सोलर प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे व अन्य मान्यवर

# पुण्यातील स्मार्ट सोलर प्रकल्पाचे ऊर्जामंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**पुणे, २९ ऑक्टोबर (आ.प्र.) :**

पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड आणि बाणेरच्या युथिका सोसायटीने स्थापित केलेल्या स्मार्ट सोलर प्रकल्पाचे उद्घाटन राज्याचे ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र जगताप, आमदार मेधा कुलकर्णी, औंध बाणेर प्रभाग समितीचे अध्यक्ष अमोल बालवाडकर आणि स्थानिक नगरसेविका स्वप्नाली सायकर, ज्योती कळमकर, तसेच ॲड. अनिल किल्लोर, युथिका अपार्टमेंट्सचे अध्यक्ष सुनीत जोशी व पदाधिकारी आणि ऊर्जा विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

सौर ऊर्जा वापराची प्रणाली आत्मसात करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि इतर आस्थापनांसाठी अनुकरणीय असे मॉडेल तयार करण्याच्या दृष्टीने पुणे स्मार्ट सिटीने या क्षेत्रातील आघाडीच्या तीन कंपन्यांसोबत स्वतंत्र सामंजस्य करार केले आहेत. सौर ऊर्जा प्रकल्प विकसित करणाऱ्या टीईपी सोलर, क्लीनमॅक्स एनव्हायरो एनर्जी सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड आणि आदित्य ग्रीन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सोबत सामंजस्य करार करून एकत्रितपणे पुणे स्मार्ट सिटीच्या माध्यमातून पुणे शहर व परिसरात रुफटॉप फोटोव्होल्टाइक सौरऊर्जा प्रकल्पांची उभारणी करण्यात येणार आहे.